किशोर

ज्ञानप्रकाश

शैक्षणिक वार्तापत्र
नोव्हेंबर २०२६



वर्ष २७ वे | संपादक : सतीश नरहरे | अंक : ८३ वा

संपादकीय...

आजचा संकल्प, उद्याचे भविष्य

मराठवाडा आणि पाणीटंचाई हे जणू समीकरणच झाले आहे. उन्हाळा जवळ आला की पाण्याची चिंता, पाण्यासाठी होणारी वणवण आणि टँकरवर अवलंबून असलेली गावे, हे चित्र आपल्या परिचयाचेच आहे. मात्र, २०२६ मधील पाणीटंचाईची तीव्रता पाहता, आता या समस्येकडे दरवर्षी येणारे संकट म्हणून पाहून चालणार नाही तर ही आपल्या अस्तित्वाशी जोडलेली गंभीर बाब आहे. पाऊस कधी कमी पडेल, कधी अनियमित होईल, यावर आपले नियंत्रण नाही; पण उपलब्ध पाण्याचा वापर किती काळजीपूर्वक करायचा, हे निश्चितच आपल्या हातात आहे.

ज्ञानप्रकाशमध्ये आपण मुलांना निसर्गाशी मैत्री करायला शिकवतो. झाडे, पक्षी, माती, पाऊस आणि पाणी यांच्याशी असलेले नाते केवळ पुस्तकातून समजून घेण्याचे नाही, तर ते आपल्या जगण्यातून व्यक्त झाले पाहिजे. पर्यावरणाविषयीची संवेदनशीलता ही एखाद्या विशिष्ट दिनापुरती किंवा उपक्रमापुरती मर्यादित राहता कामा नये तर ती आपल्या प्रत्येक कृतीतून दिसली पाहिजे. म्हणूनच ज्ञानप्रकाशच्या प्रत्येक पालकास नम्र आवाहन आहे की 'यंदा आपल्या घरातील पाणी वापराचे नियोजन नव्याने करा. पाण्याचा अपव्यय थांबवण्यासाठी कुटूंब म्हणून ठोस संकल्प करा आणि त्याची अंमलबजावणी करा. आपण वापरत असलेल्या पाण्याची गरज आणि त्यामागील निसर्गसंपत्ती यांचा विचार करा. पाणी सहज उपलब्ध असल्यामुळे त्याचा मनमानी वापर करण्याची मानसिकता बदलू या'.

पाऊस पडेल तेव्हा जलसाठे भरतील, नव्या आशा निर्माण होतील पण पुढील पावसापर्यंत पाणी पुरेल का? याचे उत्तर.. केवळ आकाशाकडे पाहून मिळणार नाही. त्यासाठी आज आपण पाणी किती जपून वापरतो व त्याचा किती जबाबदारीने वापर करतो हेही अधिक महत्त्वाचे आहे.

पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नाही; ती मागील पिढीकडून आपण घेतलेली अमूल्य ठेव आहे. ती पुढील पिढीला देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

चला, आजच जलपुनर्भरणाचा संकल्प करूया. पाण्याची टंचाई केवळ अनुभवून चालणार नाही तर तिचे गांभीर्य समजून घेऊया आणि पाणी वाचवण्याची जबाबदारी फक्त दुसऱ्यावर न सोपवता ती आपल्या कुटुंबापासूनच सुरू करूया. ***कारण पाणी असेल, तरच जीवन असेल; आणि पाणी जपले, तरच उद्याची आशा जिवंत राहील.***

सविता नरहरे
-संचालिका व मुखाध्यापिका

उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे भान असावे

-जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

लातूरचे जिल्हाधिकारी मा. डॉ. भारत बास्टेवाड यांनी मुलांशी शिक्षण, पर्यावरण आणि करिअरविषयक विचार या विषयावर संवाद साधला.

मातृभाषेतून शिक्षण घेताना कला-क्रीडा आणि प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे ज्ञान, आपली आवड व क्षमता ओळखून भविष्याची दिशा ठरवण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. याच्या मदतीनेच बदलत्या तंत्रज्ञानाच्या प्रवाहाशी जोडून घेताना विद्यार्थ्यांनी नव्या गोष्टी जाणून घ्याव्यात, नवनवीन कौशल्ये शिकावीत आणि भविष्यातील संधींसाठी स्वतःला तयार करावे असेही ते म्हणाले.

उत्सव साजरे करताना निसर्गाची काळजी घेणे, पाणी जपणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि झाडांचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

"निसर्गाची निर्मिती करणे आपल्या हातात नसले, तरी त्याचे संवर्धन करणे आपल्या हातात आहे," या विचारातून त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.





मनशक्ती केंद्र लोणावळा द्वारा आयोजित तिसऱ्या शिक्षण परिषदेमध्ये प्रकल्प प्रमुख श्री. सतीश नरहरे यांनी "ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प ही बालशिक्षणातील प्रयोगशाळा" या विषयावर मांडणी केली. 2, 3, 4 ऑक्टोबर 2026 रोजी झालेल्या शिक्षण परिषदेमध्ये महाराष्ट्रातून अनेक शिक्षणतज्ञ तसेच विविध शाळांतील 600 प्रयोगशील शिक्षकांची उपस्थिती होती.

महात्मा फुले यांच्या 200 व्या जयंती वर्षानिमित्त शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांचे व्याख्यान

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ श्री. हेरंब कुलकर्णी यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष श्री माधव बावगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी शाळेच्या उपक्रमांचे व विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे विशेष कौतुक केले. व्याख्यानाची सुरुवात त्यांनी 'युग निर्माता हम बच्चे, कल की आशा हम बच्चे...' या सुंदर गीताने केली, याला मुलांनी उत्तम साथ दिली.

याप्रसंगी बोलताना श्री. हेरंब कुलकर्णी यांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय प्रवासावर प्रकाश टाकला. जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि विषमतेविरुद्ध लढा देत त्यांनी शूद्र, अतिशूद्र व स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कशी खुली केली याची माहिती दिली. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाच्या बळावर हंटर कमिशनला दिलेले इंग्रजी निवेदन आणि 'गुलामगिरी'सारख्या ग्रंथांच्या रचनेची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे जीवनकार्य हे नेहमीच शोषित व वंचितांच्या कल्याणासाठी समर्पित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्तम वाचन संस्कृती जोपासावी, मातृभाषेतून शिक्षण घेताना इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व असावे, 'विचारी बना आणि संकटांशी मुकाबला करण्याचे धाडस ठेवा', असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे उत्तम माध्यम आहे - श्री. दत्तात्रय पवार गुरुजी

स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास माजी आदर्श शिक्षक तसेच औसा विधानसभेचे आमदार व ज्ञानप्रकाशचे माजी पालक मा. श्री. अभिमन्यू पवार यांचे वडिल मा. श्री. दत्तात्रय पवार आणि मा. श्री. अंगद कोतवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी 90 वर्षीय आदर्श शिक्षक दत्तात्रय पवार यांनी आपल्या मनोगतात ज्ञानप्रकाश प्रकल्पाच्या कार्याचे विशेष कौतुक केले. आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणाले, ...

पान २ वर...



ज्ञानप्रकाशचे 5 विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत तर 73 विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे द्वारा २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न झाला.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय जाधव आणि उपविभागीय अधिकारी (औसा-रेणापूर) श्री अविनाश कोरडे यांच्या हस्ते 73 शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

यावर्षी 4 थी, 5 वी आणि 7 वी, 8 वी या चार वर्गांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत ज्ञानप्रकाशच्या 471 विद्यार्थ्यांपैकी 73 विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत तसेच 5 विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान मिळवला आहे.

वर्षभर नियमित अभ्यास, वाढीव तास ,गटकार्य , सराव परीक्षा , तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांचे परिश्रम यातून हा उत्कृष्ट निकाल आला आहे.

अर्णव बस्तापुरे, उत्कर्ष शेळके, विश्वजीत कैले, चैतन्य जवादे, विनया गोमसाळे हे विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले आहेत.

ज्ञानप्रकाशच्या या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक ...

पान २ वर...



सतत शिकत रहा आणि आनंदी जगा...

ज्ञानप्रकाशच्या महिला पालकांना संगीता धायगुडे यांचा मोलाचा संदेश

निवृत्त प्रशासकीय अधिकारी व हुमान पुस्तकाच्या लेखिका संगीता धायगुडे यांनी ज्ञानप्रकाशच्या माहिला पालकांसाठी प्रेरणादायी मुक्तसंवाद साधला.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण घेऊन स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ठाणे महानगर पालिकेच्या माजी आयुक्त संगीता धायगुडे यांनी 'हुमान - नियतीने घातलेलं कोडं' या आत्मकथनाच्या निमित्ताने बालपणातील संघर्ष, शिक्षण, MPSC परीक्षेची तयारी, वाचनाची साधना आणि साहित्यप्रवासातील अनुभव व त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास महिला पालकांसमोर उलगडला.



या मनमोकळ्या आणि भावनिक संवादाने उपस्थित प्रत्येकीस अंतर्मुख होण्यास भाग पाडले. कार्यक्रमातून महिलांमध्ये एक ऊर्जा, चैतन्य व 'मी काहीतरी करू शकते.' असा नवा आत्मविश्वास त्यांनी जागवला.

'झाम्या' नाट्यकथेतून उलगडले मोबाईलपलीकडचे जग...



मोबाईलमध्ये गुंतलेल्या मुलांना प्रत्यक्ष मैत्रीचे मोल आणि स्वतःमधील सर्जनशीलता दाखवणारी 'झाम्या' ही कथा अतिशय प्रभावीपणे नाट्यरूपात कुल्फी त्रैमासिकचे समन्वयक कृतार्थ शेगावकर व निखील पुजारी यांनी सादर केली.

सायबर सुरक्षा जनजागृती

इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा - जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. राजर्षी शाहू महाविद्यालयाचे विद्यार्थी साहिल जाधव व परमेश्वर पांढरे यांनी सायबर सुरक्षा, सुरक्षित पासवर्ड, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करण्यासंबंधी तसेच ऑनलाइन फसवणूक टाळण्याबाबत मार्गदर्शन केले आणि संभाव्य धोक्यांचीही जाणीव करून दिली.

पान १ वरून

शिक्षण हे ....

'उगवत्या सूर्याला सगळेच नमस्कार करतात; पण मावळत्या सूर्यालाही नमस्कार करणारा ज्ञानप्रकाश हा एकमेव प्रकल्प आहे.' या शब्दांतून त्यांनी ज्ञानप्रकाशच्या सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित केले.

'परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प हा सामाजिक परिवर्तनाचे उत्तम माध्यम आहे,' असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना यशासाठी आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून दिले. आधुनिक तंत्रज्ञान आणि मोबाईलचा वापर करताना त्याचा योग्य उपयोग करणे अधिक महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करण्यासाठी प्रेरणा मिळावी, या उद्देशाने दत्तात्रय पवार यांनी दरवर्षी प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर केले.

यावेळी अंगद कोतवाडे यांनी विस्तारित ज्ञानप्रकाशचा प्रवास जवळून पाहत आल्याचा आनंद व्यक्त केला.

दोन दिवसीय तबलावादन कार्यशाळा उत्साहात संपन्न



आवर्तन प्रतिष्ठान, अष्टविनायक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानप्रकाशमध्ये आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या प्रसिद्ध तबलावादक विदुषी रिंपा शिवा व त्यांचे वडील तबलावादक पद्मश्री पंडित स्वपन शिवा (कोलकाता) यांच्या दोन दिवसीय तबलावादन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. 4 व 5 जुलै 2026 रोजी झालेल्या या कार्यशाळेत त्यांनी तबलावादनातील बारकावे समजावून सांगत उपस्थितांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी 50 हून अधिक तबला वादक सहभागी झाले होते. दोन्ही ख्यातकीर्त तबला वादकांच्या मार्गदर्शनामुळे कार्यशाळा अतिशय उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेचा समारोप रिंपा शिवा यांच्या तबला सोलो वादनाने झाला.

पुस्तके बोलत नाहीत पण ते बोलायला शिकवतात

-डॉ. नयन भादुले-राजमाने

ज्ञानप्रकाशच्या माजी पर्यवेक्षिका व साहित्यिका प्रा.डॉ. नयन भादुले-राजमाने यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त ज्ञानप्रकाश मधील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'पुस्तके बोलत नाहीत पण ते बोलायला शिकवतात,' असे सांगत त्यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

नवनवीन पुस्तकांच्या उपलब्धतेतून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड उत्तम प्रकारे जोपासली जात असल्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकावरील साहित्याची मांडणी केली त्याचबरोबर वाचलेल्या पुस्तकांचे अनुभव, त्यातून मिळालेले ज्ञान आणि झालेले सकारात्मक परिणामही सांगितले.



कृतज्ञतेची भावना हीच आनंदाची साधना...

ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात नुकताच 'कृतज्ञता दिवस' अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी कृतज्ञता दिवसाचे महत्त्व आणि प्रकल्पातील याचे प्रयोजन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या विशेष कार्यक्रमात झाडांना महत्त्व देऊन त्यांची जोपासना करणे, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे यावर भर देण्यात आला. आई-वडील, शिक्षक व निसर्ग तसेच आपले जीवन सुखकर करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आपल्याला मोलाची मदत करतात, त्यांच्या प्रती आपण नेहमी कृतज्ञ आणि ऋणी राहिले पाहिजे असे विचार यावेळी त्यांनी मांडले. रोजच्या जीवनात आपल्याला मदत करणाऱ्या प्रत्येक घटकांविषयी आदर व कृतज्ञता बाळगण्याचे आवाहन केले.



अन्नाचा अपव्यय टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना ताटात वाढलेले अन्न पूर्ण संपवण्याचा मोलाचा संदेश याप्रसंगी देण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पिकविलेल्या अन्नाचा प्रत्येक कण महत्त्वाचा असून, 'कुठेही अन्नाचा कणही वाया गेला नाही पाहिजे', याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित सर्वांसाठी प्रसाद म्हणून वरणभात - बुंदीचे सुंदर नियोजन १० वीच्या विद्यार्थांनी केले होते.

या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता व्यक्त करण्याची सकारात्मक भावना रुजण्यास मदत होईल असा विश्वास यावेळी प्रकल्प प्रमुखांनी व्यक्त केला.

राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत ज्ञानप्रकाशच्या संघाचे यश

सोलापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय लघुनाटिका स्पर्धेत ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या 'आधुनिक कीर्तन' या बालनाट्याने ४ बक्षिसे मिळवली.

१७ वर्षांपासून सुरू असलेल्या या स्पर्धेत यंदा २४ संघ सहभागी झाले होते. नवलाजी जाधव लिखित व दिग्दर्शित या नाटकाला उत्कृष्ट नाटक, उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट लेखन आणि उत्कृष्ट अभिनय अशी चार बक्षिसे मिळाली. प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे व संचालिका, मुख्याध्यापिका सविता नरहरे यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

या नाटकातील चिमुकल्या नाट्य कलाकारांनी लर्निंग होम मधील इयत्ता पाचवी ते आठवीच्या मुलांसमोर सादरीकरण करून उत्स्फूर्त दाद मिळवली.



पान १ वरून

शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी...

उप-जिल्हाधिकारी श्री अविनाश कोरडे, डॉ. अजय जाधव यांच्या हस्ते गुणगौरव चिन्ह देऊन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी श्री अविनाश कोरडे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले "यश महत्त्वाचे असले तरी यशाकडे जाण्याची प्रक्रियाही तेवढीच महत्त्वाची आहे. या प्रक्रियेचा आनंद घेणारा परिश्रमातून यशाकडे मार्गक्रमण करतो."

डॉ.अजय जाधव सर म्हणाले की, कोणतेही क्षेत्र मोठे नाही तुमच्या कार्यकर्तृत्वाने ते मोठे करा. समाजाला सर्व क्षेत्रात निष्णात व्यक्तीची गरज आहे. स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या निर्णय क्षमता असणाऱ्या तसेच तार्किक दृष्टीने विचार करणाऱ्या विद्यार्थ्यांची जगाला गरज आहे.

हे लक्षात घेऊन ज्ञानप्रकाशने बालशिक्षणात एक वेगळा पॅटर्न तयार केला आहे आणि शिक्षण क्षेत्रात स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

गणेशोत्सव 2026- लक्षवेधी क्षण

ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात इयत्ता दहावीचे विद्यार्थी गणेशोत्सवानिमित्त पाहुण्यांना निमंत्रित करण्याची तसेच आयोजनाची संपूर्ण जबाबदारी घेतात. यावर्षीच्या 10 दिवसीय गणेशोत्सवातही विविध कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या पाहुण्यांचे अनुभव मुलांना ऐकता आले.



गणेशोत्सवातील कार्यक्रमानिमित्त डॉ. अर्चनाताई पाटील यांनी मुलांशी संवाद साधला.

'निसर्गाच्या लयीतच संगीत वसलेले असून, संगीतामुळे मन आणि भावना निर्मळ होतात; पर्यायाने नव्या पिढीवर उत्तम संस्कार रुजवणे अधिक सहज व सोपे जाते हे ज्ञानप्रकाश मध्ये दिसून आले असे त्या म्हणाल्या.

आंतरराष्ट्रिय ख्यातीचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री संकेत बारस्कर यांनी चित्रकार म्हणून आपल्या घडण्याचा प्रवास मुलांना सांगितला. चित्रांच्या वेगळ्याच जगात ते मुलांना घेऊन गेले आणि रंग, रेषा, कल्पनाशक्तीच्या माध्यमातून व्यक्त होण्याची दृष्टी दिली.

सुप्रसिद्ध गायिका सायली टाक यांच्या सुरेल गायनाने मुलांना मंत्रमुग्ध केले तर नकलाकार शिवपुत्र स्वामी यांच्या बहारदार नकलांनी विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले.

ज्ञानप्रकाशच्या माजी पालक व दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी टेंभुर्णीकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना नातेसंबंध, संस्कार, परिश्रम आणि जीवनकौशल्यांचे महत्त्व उलगडून सांगितले. ज्ञानप्रकाशचे पालक म्हणून घेतलेले अनुभवही सांगितले. 'ज्ञानप्रकाशचे पालक असणं म्हणजे मुलांच्या सोबत पालक म्हणून घडण्याचा प्रवास अनुभवणं' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नाथानी यांनी आपल्या रसाळ वाणीतून कथा सांगत मुलांना जीवनमूल्यांची सुंदर शिकवण दिली.

विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

बोस्टन विद्यापीठ अमेरिका येथून शिक्षण घेतलेले सिद्धांत नरहरे, नेहा आणि हृदय यांनी 7 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या कार्यशाळेत शिक्षण, करिअर आणि मानसिक आरोग्य त्याचबरोबर भविष्यासाठी योग्य दिशा कसे निवडावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना "मोठी स्वप्ने पाहा आणि त्या स्वप्नांची स्पष्ट कल्पना (Visualization) मनात उभी करा" हा महत्त्वाचा संदेश दिला. कोणतेही ध्येय गाठण्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवणे आवश्यक असून, "I Am The Best" हा सकारात्मक आत्मविश्वासाचा मंत्र विद्यार्थ्यांनी अंगीकारावा, असे ते म्हणाले. तसेच विद्यार्थ्यांना Vision Board तयार करण्याची संकल्पना समजावून सांगितली.

या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या भविष्यातील स्वप्नांना, ध्येयांना आणि करिअरच्या उद्दिष्टांना चित्रे, शब्द आणि कल्पनांच्या माध्यमातून कागदावर साकार केले.

यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्दिष्ट निश्चिती, सकारात्मक विचार आणि भविष्याबद्दलची स्पष्टता निर्माण होण्यास मदत होईल व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असे
उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरतील अशी भावना पालकांनी व्यक्त केली.



विसुभाऊ बापट यांचा 3051 वा ओंकार काव्य दर्शन कार्यक्रम संपन्न

प्रसिद्ध कवी विसुभाऊ बापट यांनी मुलांसमोर अभिनय गीत व बालगीतांचे विविध प्रकार सादर केले. कविता म्हणजे उत्कट भावनांचा आविष्कार असतो यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचन, श्रवण व साहित्याची आवड निर्माण होणे आवश्यक असते असे ते म्हणाले.

'जल्लोष लोककलेचा' स्पर्धेत ज्ञानप्रकाशला सर्वसाधारण विजेतेपद



बालरंगभूमी परिषद मुंबई शाखा लातूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जल्लोष लोककलेचा 2026 या गायन, वादन आणि समूहगायन स्पर्धेत ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कला-कौशल्याची दमदार छाप पाडत घवघवीत यश संपादन केले. या सर्व मुलांना मयुर येणगे यांनी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत चार पारितोषिके मिळवत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला. समूहगायन– प्रथम, वैयक्तिक वाद्य वादन– प्रथम, वैयक्तिक वाद्य वादन– द्वितीय, वैयक्तिक गायन– तृतीय. विशेष म्हणजे या स्पर्धेत सर्वाधिक पारितोषिके मिळवून ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाने 'सर्वसाधारण विजेतेपद' मिळवले. बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती, मुंबईच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ लावणी कलावंत सुरेखाताई पुणेकर आणि लातूरचा युवा गायक मंगेश बोरगावकर हे ही उपस्थित होते.



ज्ञानप्रकाशमध्ये आकाश कंदीलारोहणानंतर दिवाळी सुट्टी होते. बालभवनच्या प्रत्येक मुलास ताईंनी बनवलेला आकाश कंदील दिला जातो. आकाश कंदिलाच्या मिरवणुकीचा आनंद घेताना बालभवनची मुले आणि पालक.

इयत्ता 10 वी 2025-26 चा निकाल

परीक्षा देणारे एकूण विद्यार्थी..... 85 विद्यार्थी

100 टक्के घेणारे	3 विद्यार्थी
91 ते 99 टक्के घेणारे	45 विद्यार्थी
86 ते 90 टक्के घेणारे	15 विद्यार्थी
81 ते 85 टक्के घेणारे	08 विद्यार्थी
75 ते 80 टक्के घेणारे	08 विद्यार्थी

शालेय क्रीडा स्पर्धांमधील विद्यार्थ्यांचे यश

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड

1.बुद्धिबळ
1. राघव कल्पना प्रताप भांदरगे

2 .100 मीटर धावणे
1. आर्यन अंजली नंदकुमार भोसले

3 .मल्लखांब व रोप मल्लखांब
1.अपूर्वा कमल विष्णू चव्हाण
2.तेजस्वी शितल अरुण पळकुटे

4.बॅडमिंटन
1. शुभ्रा जयश्री गिरीश कुलकर्णी

5.इनलाइन स्केटिंग
1. अर्णव केतकी मुकेश राजेमाने

6. योगासन आर्टिस्टिक सिंगल
1. विहान विजया निलेश राजमाने
2. रोनित हेमलता बालाजी वाडकर
3. क्षितिज लक्ष्मी बालाजी सलगर

विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

1.तलवारबाजी
1. समरसिंग माधुरी विजयकुमार पाटील

2 .बुद्धिबळ
1.राघव कल्पना प्रताप भांदरगे
2.अवनी पल्लवी संजीव बस्तापुरे

3 .रायफल शूटिंग
1. भार्गव श्रद्धा गंगाधर कनकधर

4 . squash
1. अनन्या सुप्रिया राजकुमार गायकवाड

5 .बॅडमिंटन
1.वत्सल पल्लवी उमेश काटेकर
2 .मनस्वी मनीषा सचिन पाटील
3.स्वस्ति वृंदा शाम भोपे
4.गौरी श्रेया विठ्ठल दुडीले
5.मयुरी श्रद्धा शिवकुमार आयनापुरे

6.मॉडर्न पेंटाथलॉन
1.गणेश रुक्मीन शिवराम क्षीरसागर
2 .सोहम सोनाली संताजी रेड्डी

7.पोहणे
1 .गणेश रुक्मीन शिवराम क्षीरसागर
2. ऋजुता सारिका महेश घोडके
3. अथांग शितल संकल्प गड्डीमे

8.सायकलिंग
1 . गणेश रुक्मीन शिवराम क्षीरसागर
2 .शौर्य शितल मनोज कुमार देवणे

9 .मल्लखांब व रोप मल्लखांब
1. शौर्य स्वाती प्रमोद भोयरेकर
2 .प्रीत अर्चना विजय जाधव
3. तेजस्वी शितल अरुण पुळकुटे
4. अपूर्वा कमल विष्णू चव्हाण

10 .कॅरम
1. शौर्य सोनाली सचिन काकडे

11.योगासन
1 .संस्कार पूजा विनोद बेलकुंडे
2.वैष्णव प्रगती नितीन पडिले
3.अपूर्वा कमल विष्णू चव्हाण
4.वैदही रेखा वसंत पाटील

12. किक बॉक्सिंग
1. अक्षरा उज्वला रवी भुजबळ

13. आर्चरी
1. श्रुतिका मयुरी दिग्विजय कुतवळ

14.टेबल टेनिस
अनया शितल संकल्प गड्डीमे

15. जिम्नॅस्टिक
1. राजलक्ष्मी कविता पवन लड्डा
2. अन्वी सुमित्रा अनिरुद्ध बिराजदार

16.खो-खो संघ (जिल्ह्यात दुसरा)
1) स्वरा चेतना तानाजी कोकाटे
2) सिध्दी संजीवनी शंकर पांचाळ
3) अनया शितल संकल्प गड्डीमे
4) प्रांजल गीता गोविंद जाधव
5) राजेश्वरी श्रद्धा जितेंद्र पवार
6) साक्षी आरती दिपक शिंदे
7) अनुष्का आशा योगीराज पुणेकर
8) गौरवी मायावती गजानन मादरपल्ले
9) रितीका उषा गुणवंत आकनगिरे
10) सिध्दी ज्योती भारत खंदाडे
11) अंकिता माया शिवदास बिडवे
12) समृद्धी कल्पना प्रताप भांदरगे
13) श्रावणी शुभांगी परमेश्वर पाटील
14) आरोही ज्योती सचिन शिंदे

सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन...



गणेशोत्सवानिमित्त माजी विद्यार्थ्यांची प्रकल्पास भेट..



संगीता धायगुडे यांचा महिला पालकांशी भावनिक संवाद...


विद्यार्थ्यांसमोर बालनाट्य सादर करताना चिमुकले कलाकार ...


इयत्ता पहिलीचा सहल अनुभव...



विविध शाळांतील शिक्षकांसाठी 2 दिवशीय लायन्स क्वेस्ट कार्यशाळा...


इ. 10 वी गणेशोत्सव मिरवणुकीत लेझिम खेळताना ...


आषाढी एकादशी निमित्त मुलांची वृक्षदिंडी आणि रिंगण सोहळा.



जिल्हा स्तरीय समूह गीतगायन स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक.


दिवाळीचा फराळ एकत्र करताना बालभवनातील मुलांचा उत्साह.


नरहरे मॅडम कडून गोडूळ खत निर्मिती प्रक्रिया समजून घेताना.


स्वतः बनवलेला आकाश कंदील दाखवतानाचा आनंद...


गुलाब पाकळी देऊन मुलांच्या सुंदर हस्ताक्षराचे कौतुक


पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळेसाठी सहभागी विद्यार्थी...


सामूहिक चित्र रेखाटन करताना.


एकदिवशीय बाल अनापान शिबिरात सहभागी विद्यार्थी.


गणेशोत्वानिमित्त टिपरी हा पारंपरिक खेळ खेळताना 10 वी च्या विद्यार्थीनी.


अनंत चतुर्दशी - 10 वी संकल्प दिवस.


कपड्यांची घडी करणे हाही एक ताण.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ३७ वे वर्ष
नरहरे क्लासेस (गणित) लातूर
नरहरे क्लासेस
प्रवेश प्रक्रिया ९ मे पासून...
संचालक : सतीश नरहरे ➤ 8th, 9th, 10th Maths ➤ State Board / CBSE Maths Batches
ज्ञानप्रकाश इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन अँण्ड रिसर्च सेंटर, नरहरे क्लासेस, लातूर. फोन : ०२३८२-२२०५९८, २२४५९९, ९४२२९६५४६४